<u>नि. फौ. ख. क्र. २१२/२०१३</u>                    निशाणी ६१

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. ५ यांचा जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – पुंजाजी नारायण जामोदे

वय – ६० वर्षे,                    व्यवसाय – सेवानिवृत्त ग्रामसेवक

पत्ता – जवाहर नगर, अकोला, ता. जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. व्ही. इंगळे यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. सन २००६ मध्ये मी ग्रामपंचायत निमकर्दा येथे ग्रामसेवक म्हणुन कार्यरत होतो. मी सन १९९४ ते एप्रिल २०११ पर्यंत ग्रामसेवक म्हणुन कार्यरत होतो. मी ग्रामपंचायत निमकर्दा येथे ग्रामसेवक म्हणुन कार्यरत असतांना दारिद्रय रेषेखालील व्यक्तींची नावे वगळणेबाबत यादी तयार केली होती. आता मला सदरची यादी दाखविण्यात आली. ती मीच तयार केली होती. सदर यादीमध्ये आरोपी गोपाल श्रीधर वंजारे यांचे नाव नमुद आहे. सदर यादीमध्ये गोपाल वंजारे हे कोतवाल म्हणुन नोकरीवर असल्याचा आक्षेप आला होता, त्या कारणामुळे त्यांचे नाव वगळण्यात आले. सदर वगळण्यात आलेल्या व्यक्तींच्या नावाची शिफारस मी पंचायत समितीला केली होती. सदर यादीवर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (सदर यादीला निशाणी देण्यास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. एस.टी. इंगळे यांनी हरकत नोंदविली. त्यांनी असा आक्षेप घेतला की, सदर यादीवर फक्त सही शिक्के मारले असुन सदरचा दस्त छायांकित आहे. त्यावर सरकार पक्षा तर्फे श्रीमती एस.व्ही. इंगळे यांनी असा युक्तिवाद केला की, सदरचा दस्त मुळ असुन साक्षीदाराने तो ओळखला त्यावर साक्षीदाराची सही आहे. आदेश – दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभिलखावर दाखल यादीचा दस्त संबंधीत विभागाकडुन मुळ दस्त म्हणुन दाखल करण्यात आलेला दस्त सारखाच असल्याचे दिसुन येते. परंतु दोषारोपपत्रासोबत दाखल केलेला दस्त ही छायांकित प्रत असुन संबंधीत विभागाकडुन दिलेल्या पत्रासोबत निशाणी क्र. ५९ दाखल यादीचा दस्त छायांकित प्रत पेक्षा काही अंशी भिन्न आहे. सदरचा दस्त हा मुळ आहे की छायांकित प्रत आहे हा मुद्दा आणि सदर दस्ताचे पुराव्याचे मुल्य न्यायानिर्णय करतांना ठरविण्यात येईल.) आता सदर यादीला **नि.क्र. ६२** देण्यात येते.

२. मी आरोपीच्या मालकीच्या घर त्याचे नावावर असलेबाबत गट विकास अधिकारी, बाळापूर यांना पत्र देवुन कळविले होते. मला सदरचे पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर ग्रामपंचायतचा शिक्का आहे. (सदर पत्राला निशाणी देण्यास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. एस.टी. इंगळे यांनी हरकत नोंदविली. त्यांनी असा आक्षेप घेतला की, सदर पत्रावर फक्त सही शिक्के मारले असुन सदरचा दस्त छायांकित आहे. त्यावर सरकार पक्षा तर्फे श्रीमती एस.व्ही. इंगळे यांनी असा युक्तिवाद केला की, सदरचा दस्त मुळ असुन साक्षीदाराने तो ओळखला त्यावर साक्षीदाराची सही आहे. आदेश – दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभिलखावर दाखल पत्राचा दस्त संबंधीत विभागाकडुन मुळ दस्त म्हणुन दाखल करण्यात आलेला दस्त सारखाच असल्याचे दिसुन येते. परंतु दोषारोपपत्रासोबत दाखल केलेला दस्त ही छायांकित प्रत असुन संबंधीत विभागाकडुन दिलेल्या पत्रासोबत निशाणी क्र. ५९ दाखल पत्राचा दस्त छायांकित प्रत पेक्षा काही अंशी भिन्न आहे. सदरचा दस्त हा मुळ आहे की छायांकित प्रत आहे हा मुद्दा आणि सदर दस्ताचे पुराव्याचे मुल्य न्यायानिर्णय करतांना ठरविण्यात येईल.) आता सदर यादीला **नि.क्र. ६३** देण्यात येते.

३. आरोपीने घरकुल मिळणेकरिता अर्ज केला होता. घरकुलाचे अर्ज आणि दस्तावेज ग्रामपंचायतचे सचिव यांचे ताब्यात असतात. सन २०१३ मध्ये श्री. एस.एस.लोथे हे ग्रामपंचायत निमकर्दा येथे सचिव म्हणुन कार्यरत होते. ग्रामपंचायत कार्यालयात आलेले अर्ज किंवा दस्तावेज किती वर्षापर्यंत ठेवण्यात येते त्याबाबत मला माहिती नाही. या प्रकरणात या दोन दस्तांवेज व्यतिरिक्त मला कोणतीही माहिती नाही. मी सन २०११ मध्ये बदलुन गेल्यानंतर मला कोणतीही माहिती नाही. घरकुलच्या यादीत आरोपीचे नाव होते. त्या व्यतिरिक्त मला घटनेबद्दल काही माहित नाही.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.टी. इंगळे यांच्या मार्फत –</u>**

४. दारिद्रय रेषेखालील कार्ड किंवा घरकुलाची यादी गट विकास अधिकारी यांच्या अधिपत्या खाली तयार केली जाते. सदर यादी तयार केल्यानंतर त्यावर कोणाचा आक्षेप असल्यास हरकत मागविली जाते. हरकत आल्यास ती हरकत विचारात घेवुन ती सुपुर्ण यादी तक्रारसह ग्रामसभेत मांडली जाते. त्यानंतर त्याची अंतिम यादी तयार होते. अंतिम

यादी तयार झाल्यानंतर पुढील कार्यवाही करिता ती गट विकास अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येते. त्यानंतर संपुर्ण कार्यवाहीचे अधिकार गट विकास अधिकारी यांना असतो आणि त्यांच्या अधिपत्या खाली पुढील कार्यवाही केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, दारिद्र रेषेखालील यादी आणि घरकुलाची यादी शासनाचे सर्व निकष विचारात घेवुन तयार केली जाते आणि त्यांनतर ती गट विकास अधिकारी यांच्याकडे पाठविली जाते.

५. साक्षीदाराला नि.क्र. ६२ दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, लाभार्थ्यांना घरकुल मंजुर झालेली यादी पंचायत समिती यांच्याकडे पाठविण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, कोण कोणत्या लाभार्थ्यांना घरकुल मंजुर झाले, त्यांची नावे मी घरकुल मंजुर झालेली यादी पाहिल्या शिवाय मला सांगता येणार नाही. पुराव्या देण्यापुर्वी मी प्रकरणाचा न्यायालयातील संपुर्ण अभिलेख पाहिला आहे. साक्षीदाराला नि.क्र. ६३ दाखविण्यात आली. नि.क्र. ६३ मध्ये नमुद दिनांक १०.०८.२००९ रोजीचे पंचायत समिती, बाळापुरचे संदर्भिय पत्र अभिलेखावर दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ६३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मी आरोपी गोपाल श्रीधर वंजारे यांचे निमकर्दा येथे घर असलेबाबत ग्रामपंचायत गाव नमुना ८ चा उतारा सदर पत्रासोबत पाठविलेला नाही. नि.क्र. ६३ मध्ये नमुद मालमत्ता क्र. १०० ची नोंद आरोपीच्या नावाने कोणत्या वर्षी झाली ही बाब सदर पत्रावरुन सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गोपालनाथ शंकरनाथ वंजारे या नावाचे गावात इतर व्यक्ती असु शकतात. ग्रामपंचायतच्या अभिलेखावरुन मुळ मालकी हक्क प्राप्त होत नाही. नझुल अभिलेख हा मालकी हक्काचा अभिलेख असतो. हे म्हणणे खरे नाही की, गट विकास अधिकारी यांच्या मागणीवरुन मी नि.क्र. ६२ व ६३ तयार करुन दिले. नि.क्र. ६२ व ६३ बाबत मला यापुढे कोणीही चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.01.09 11:08:10 +0530

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर

बाळापूर.
दि.०८/०१/२०२५